मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातींसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 10 जानेवारी 2026 | पान- 1

# निकाल 22 फेऱ्यांत; तर गुलाल पाच तासांत

## आठ केंद्रांवर होणार मतमोजणी; प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र टेबल्स असणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीचे मतदान गुरुवारी (दि.१५), तर शुक्रवारी (दि.१६) मतमोजणी होणार आहे. अवघ्या पाच तासांत २२ फेऱ्यांमध्ये संपूर्ण निकाल जाहीर करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. दुपारी तीनपर्यंत विजयाचा गुलाल उधळला जाईल. कमी वेळेत, पण अचूक आणि पारदर्शक पद्धतीने मतमोजणी पूर्ण करण्यासाठी यंत्रणा सज्ज करण्यात येत आहे.

मतमोजणी प्रक्रियेसाठी शहरात आठ ठिकाणी स्वतंत्र मतमोजणी केंद्रे उभारण्यात आली आहेत. प्रत्येक केंद्रावर प्रभागनिहाय व्यवस्था करण्यात आली असून, प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र टेबल्स असणार आहेत. त्यामुळे मतमोजणीदरम्यान गोंधळ टाळता येणार असून, निकाल त्वरित जाहीर करता येणार आहे. प्रत्येक फेरी संपल्यानंतर संबंधित प्रभागाचा आघाडी-पराभवाचा तपशील जाहीर केला जाणार आहे.



सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची निगराणी

मतमोजणीसाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक टेबलवर मतमोजणी पर्यवेक्षक, सहाय्यक कर्मचारी तसेच उमेदवारांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीत पार पडणार आहे. मतमोजणी केंद्र परिसरात कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### सकाळी 10 वाजता सुरुवात

» मतमोजणी सकाळी १० वाजता वेळेत सुरू होऊन, टप्प्याटप्प्याने २२ फेऱ्यांमध्ये पूर्ण केली जाणार आहे. मतांची संख्या मोठी असली तरी आधुनिक यंत्रणा, संगणकीय नोंद आणि पूर्वनियोजनामुळे निकाल लवकर जाहीर होण्याचा प्रशासनाचा दावा आहे. निकालाच्या प्रत्येक टप्प्यावर माहिती अधिकृतपणे जाहीर केली जाणार असल्याने अफवा पसरू नयेत, यासाठीही विशेष खबरदारी घेण्यात आली आहे.

“ चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृह येथे अभिरक्षा कक्ष स्थापना केला आहे. तेथे ईव्हीएमची साठवणूक व्यवस्था, सीलबंदची यंत्रणा, सुरक्षा व्यवस्था, प्रवेश नियंत्रण प्रणाली तसेच संबंधित कागदपत्रे ठेवण्यात आली आहेत. मतदानासाठी वापरण्यात येणारी मतदान यंत्रे व निवडणूक साहित्य राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विविध जिल्ह्यांतून पिंपरीत आणण्यात आले असून, ते अभिरक्षा कक्षामध्ये सुरक्षितरीत्या ठेवण्यात आले आहेत.

**- प्रमोद ओंबासे, मुख्य अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

---

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भव्य जाहीर सभा

## महापालिका निवडणूक प्रचाराचा शुभारंभ; आमदार अमित गोरखे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीकडून प्रचाराला वेग आला असून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची भव्य जाहीर सभा पिंपरी-चिंचवड शहरात आयोजित करण्यात आली आहे.

ही जाहीर सभा शनिवार, दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता, आकुर्डी येथील श्री



विठ्ठल मंदिर परिसरात पार पडणार आहे. या सभेमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपच्या सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात राबविण्यात आलेल्या विकासकामांचा आढावा, तसेच पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील विकासाचा रोडमॅप यावेळी मांडण्यात येणार आहे. या सभेला पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या जाहीर सभेच्या आयोजनाबाबतची माहिती आमदार अमित गोरखे यांनी दिली. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीमुळे पिंपरी-चिंचवडमधील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, ही सभा आगामी निवडणुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

# ज्येष्ठ नागरिकांचा मतदानासाठी ठाम निर्धार

## ज्येष्ठ नागरिकांनी मतदानाची शपथ घेऊन येत्या 15 जानेवारीला मतदान करण्याचा संकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाचे महत्त्व प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महापालिकेतर्फे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व मतदान जनजागृतीपर स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. याच अभियानाचा एक भाग म्हणून शहरातील नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन संत तुकाराम नगर येथील विरंगुळा केंद्र येथे करण्यात आले होते.

महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या या उपक्रमात अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त ममता शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ यांच्यासह मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमात मतदान जनजागृतीपर विशेष पथनाट्य तसेच फ्लॅशमॉबचे सादरीकरण करण्यात आले. या माध्यमातून लोकशाही प्रक्रियेत मतदानाचे महत्त्व, नागरिकांची जबाबदारी आणि मतदानाचा हक्क याबाबत प्रभावी संदेश देण्यात आला. तसेच उपस्थित शेकडो ज्येष्ठ नागरिकांना मतदानाची शपथ देण्यात आली.

यावेळी, “आम्ही भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू,” अशी मतदानाची शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.



“ ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे मार्गदर्शक असतात. त्यांनी मतदानाचा संकल्प करून दिलेला संदेश समाजातील प्रत्येक घटकासाठी प्रेरणादायी आहे. येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावून लोकशाही अधिक सक्षम करावी.

**- तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

“ लोकशाहीची खरी ताकद ही सक्रिय मतदारांमध्ये असते. ज्येष्ठ नागरिकांनी घेतलेली मतदानाची शपथ ही तरुण पिढीसाठी आदर्श ठरणारी आहे. निर्भय, निःपक्षपाती आणि शांततेत मतदान करून नागरिकांनी लोकशाहीच्या सुदृढतेस हातभार लावावा.

**- ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# निष्ठेचा महामेरू आणि रुपीनगर- तळवडे विकासाचे शिल्पकार : कै. अशोकभाऊ पवार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडच्या राजकीय आणि सामाजिक पटलावरील एक निष्ठावंत नेतृत्व, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि तळवडे गावाचे माजी सरपंच कै. श्री. अशोकभाऊ दत्तात्रय पवार यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या जाण्याने केवळ पवार परिवाराचीच नव्हे, तर आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांच्या विचारांवर चालणाऱ्या एका खंबीर शिलेदाराची आणि रुपीनगरच्या आधारस्तंभाची मोठी हानी झाली आहे.

**पन्नास वर्षांचा निष्ठेचा प्रवास**

१९७१ सालापासून सार्वजनिक जीवनात सक्रिय असलेले अशोकभाऊ म्हणजे 'निष्ठा' या शब्दाचे चालतेबोलते उदाहरण होते. काँग्रेस (एस) पासून ते राष्ट्रवादी काँग्रेसपर्यंतच्या प्रवासात, राजकीय चढ-उतार आले तरी त्यांनी शरद पवार साहेबांची साथ कधीच सोडली नाही. एक कार्यकर्ता कसा असावा आणि पक्षाप्रती समर्पण काय असते, याचा वस्तुपाठ त्यांनी आपल्या कार्यातून घालून दिला.

**शिक्षणाचा वटवृक्ष: ज्ञानदीप विद्या मंदिर**

व्यक्तीच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा पाया म्हणजे शिक्षण — हे ओळखून रुपीनगरमध्ये “ज्ञानदीप विद्या मंदिर” या शाळेच्या माध्यमातून त्यांनी सर्व सामाजिक प्रतिनिधी, ज्येष्ठ मंडळी व ग्रामस्थांच्या समवेत मिळून शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला.

अशोकभाऊंचा दृष्टिकोन केवळ राजकारणापुरता मर्यादित नव्हता. शिक्षणाशिवाय समाजाचा विकास शक्य नाही, हे ओळखून त्यांनी रुपीनगरमध्ये “ज्ञानदीप विद्या मंदिर” या शाळेची स्थापना केली. ग्रामस्थ आणि ज्येष्ठ मंडळींना सोबत घेऊन त्यांनी लावलेले हे छोटेसे रोपटे आज एका विशाल वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. आज या शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेली मुले विविध क्षेत्रांत उत्तुंग भरारी घेत आहेत, हे त्यांच्या दूरदृष्टीचे फळ आहे.



**रुपीनगरच्या विकासाचा पाया**

» आज आपण जे आधुनिक रुपीनगर पाहतो, त्या विकासाच्या पायाभरणीत अशोकभाऊंचा सिंहाचा वाटा आहे.

» मूलभूत सुविधा: रस्ते, पाणी आणि वीज यांसारख्या मूलभूत प्रश्नांसाठी त्यांनी दिलेला लढा ऐतिहासिक होता.

» धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा: रुपीनगरचे श्रद्धास्थान असलेल्या घरजाई माता मंदिराच्या उभारणीत त्यांनी घेतलेले कष्ट आणि दाखवलेली श्रद्धा आजही लोकांच्या स्मरणात आहे.

» जनसंपर्क: 'सर्वसामान्य माणसाचा माणूस' ही त्यांची ओळख होती. सामान्यांच्या अडीअडचणीत धावून जाणे हा त्यांचा स्वभाव होता.

**एक न विझणारा विचार**

देहाने अशोकभाऊ आज आपल्यात नसले, तरी त्यांनी रुपीनगरच्या मातीत पेरलेले विचारांचे बी आणि त्यांनी दिलेला सेवेचा वसा कधीच पुसला जाणार नाही. पिंपरी-चिंचवड आणि विशेषतः तळवडे-रुपीनगर परिसराच्या इतिहासात त्यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल.

"ज्ञानाचा दीप पेटवून गेले,
सेवेचा वसा देऊन गेले,
रुपीनगरच्या मातीमध्ये स्वप्नांची बीजे पेरून गेले."

अशा या थोर समाजसेवकास आणि आदरणीय पवार साहेबांच्या खंद्या समर्थकास विनम्र भावपूर्ण श्रद्धांजली!

# काँग्रेस-'वंचित'मधील झुंज भाजपच्या पथ्यावर?

## आघाडी फसल्याने या ठिकाणी 'वंचित'ने उमेदवार उभे केल्याने मतविभागणी भाजपच्या पथ्यावर पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ गेल्या सलग तीन निवडणुकांमध्ये भाजपला साथ देत असल्याने एकेकाळचा काँग्रेसचा हा बालेकिल्ला आता भाजपचा झाला आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकांमध्ये काँग्रेससाठी ही निवडणूक आव्हानात्मक बनली आहे. माजी राज्यमंत्री रमेश बागवे यांनी चिरंजीव, माजी नगसेवक अविनाश बागवे आणि स्नूषा इंदिरा या दोघांनाही निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. मात्र, त्यांच्यासमोर भाजपने अनुक्रमे पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष विवेक यादव आणि माजी नगरसेवक बापू कांबळे यांची पत्नी मृणाल कांबळे यांना उमेदवारी दिल्याने बागवे यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची झाली आहे. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यातील आघाडी फसल्याने या ठिकाणी 'वंचित'ने उमेदवार उभे केल्याने मतविभागणी भाजपच्या पथ्यावर पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे.




### अविनाश बागवेंसमोर विवेक यादव यांचे आव्हान

» या प्रभागाच्या ड जागेवरून भाजपने पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष विवेक यादव यांना उमेदवारी देऊन माजी नगरसेवक अविनाश बागवे यांच्यापुढे आव्हान उभे केले आहे. नवीन प्रभाग रचनेमध्ये बागवे यांच्या मूळ प्रभागातील बहुतांश भाग वगळला गेला आहे. डायस प्लॉटचा परिसर या मतदारसंघाला जोडल्यामुळे हा मतदारसंघ भाजपबहुल झाला आहे. त्यामुळे यादव आणि बागवे यांच्यात सरळ लढत होणार आहे. या प्रभागात 'वंचित'ने विकी भालेराव हे उमेदवार उभे केल्याने मतांची विभागणी ही यादव यांच्या दृष्टीने जमेची बाजू झाली आहे. अविनाश बागवे हे सलग तिसऱ्यांदा निवडून येण्यासाठी प्रयत्नशील असताना यादव यांचे कडवे आव्हान असणार आहे.

या विधानसभा मतदारसंघात प्रभाग क्रमांक १३ पुणे स्टेशन जय जवान नगर, प्रभाग क्रमांक १४ कोरेगाव पार्क- घोरपडी- मुंढवा, प्रभाग क्रमांक २२ काशेवाडी डायस प्लॉट या प्रभागांचा समावेश होतो. त्यापैकी काशेवाडी- डायस प्लॉट हा प्रभाग काँग्रेसच्या दृष्टीने प्रतिष्ठा पणाला लावणारा ठरला आहे.

या विधानसभा मतदारसंघात बागवे विरुद्ध कांबळे अशी लढत होत आली आहे. भाजपचे माजी मंत्री दिलीप कांबळे यांनी बागवे यांचा २००९ आणि २०१४ असा दोन वेळा आणि २०२४ मध्ये त्यांचे बंधू, विद्यमान आमदार सुनील कांबळे यांनी पराभव केला. कांबळे यांनी बागवे यांचे चिरंजीव अविनाश यांच्याविरुद्ध यादव यांना उमेदवारी दिल्याने चुरस निर्माण झाली आहे.

बागवे यांच्या स्नूषा इंदिरा यांच्याविरोधात भाजपने माजी नगरसेवक बापू कांबळे यांची पत्नी मृणाल यांना उमेदवारी दिली आहे. या ठिकाणी 'वंचित'ने आरती कल्याणी यांना उभे केले आहे.

या प्रभागाच्या ब जागेवर भाजपचे माजी नगरसेवक संदीप लडकत आणि काँग्रेसचे माजी नगरसेवक रफीक शेख यांच्यात सरळ लढत होणार आहे.

या प्रभागाच्या क जागेवर माजी नगरसेविका अर्चना पाटील यांच्यासमोर काँग्रेसचे दिलशान जुबेर बाबू आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जावेद खान फिरोजा यांचे आव्हान असणार आहे.

### काँग्रेसचा कस

» नवीन प्रभाग रचनेत पुणे स्टेशन – जय जवाननगर या प्रभागाचा काही भाग हा पुणे कॅन्टोन्मेंट आणि उर्वरित परिसर कसबा विधानसभा मतदारसंघातील आहे. त्यामुळे या प्रभागात काँग्रेसच्या उमेदवारांचा कस लागणार आहे. या प्रभागात ड विभागात काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे हे उमेदवार आहेत.

### तिरंगी लढत

» या मतदारसंघातील प्रभाग १४ – कोरेगाव पार्क- घोरपडी- मुंढवा या प्रभागात तीन माजी नररसेवकांमुळे तिरंगी लढत होणार आहे. भाजपने माजी नगरसेवक उमेश गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसने माजी उपमहापौर सुनील गायकवाड यांना आणि मनसेने माजी नगरसेवक बाबू वागसकर यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेस- शिवसेना (ठाकरे) पक्षाची आघाडी असून शिवसेनेने ही जागा मनसेला दिली आहे. त्यामुळे काँग्रेसचा उमेदवार नाही.


# आरोग्य विभागाचं मोठं पाऊल: सरकारी रुग्णालयांची आता अचानक तपासणी

## सरकारी रुग्णालयातील आरोग्य व्यवस्था सुरळीत सुरु आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाने भरारी पथकांची नियुक्ती केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

सरकारी रुग्णालयातील आरोग्य व्यवस्था सुरळीत सुरू आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाने भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. ही पथके कोणत्याही रुग्णालयाला अचानक भेट देऊन तपासणी करणार आहेत. यात कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रुग्णालयातील व्यवस्था, स्वच्छता यासह इतर अनेक बाबींची तपासणी करण्यात येणार आहे. यामुळे सरकारी रुग्णालयांचे कामकाज सुधारण्यास मदत होणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुणे परिमंडळाने




भरारी पथकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार, परिमंडळ स्तरावर दोन भरारी पथक नेमण्यात आली आहेत. पुणे, सोलापूर आणि सातारा जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा व स्त्री रुग्णालयांना हे भरारी पथक अचानक भेटी देऊन तपासणी करणार आहे. पहिल्या पथकात आरोग्य सेवा पुणे मंडळाचे उपसंचालक डॉ. भगवान पवार, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. आरिफ सय्यद, कार्यक्रम व्यवस्थापक गणेश जगताप, मूल्यमापन व संनियंत्रण अधिकारी धनाली कौलगे, सुविधा व्यवस्थापक सागर शेळके यांचा समावेश आहे. दुसऱ्या पथकात प्रादेशिक मनोरुग्णालय येरवड्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. श्रीनिवास कोलोड, रुग्णालयाचे कार्यालयीन अधीक्षक प्रशांत बडगीरे आणि राष्ट्रीय क्षय निर्मूलन कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. रोहन घुगे यांचा समावेश आहे.

सरकारी रुग्णालयांच्या इमारतीची अवस्था, सुरक्षितता आणि स्वच्छता या तपासणीवर भरारी पथकांकडून जास्त भर दिला जाणार आहे.

### जिल्हास्तरीय पथकांचीही नियुक्ती

» आरोग्य विभागाने पुणे, सातारा, सोलापूरसाठी सरकारी रुग्णालयांच्या नियमित तपासणीसाठी जिल्हास्तरीय पथकांची नियुक्तीही केली आहे. पुण्यात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यम्पल्ले, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. भाग्यश्री पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. सुहास कोरे आणि सहायक संचालक (हिवताप) डॉ. प्रताप सारणीकर यांच्या नेतृत्वाखाली चार पथकांची नियुक्ती केली आहे. या पथकांकडूनही सरकारी रुग्णालयांची नियमितपणे तपासणी केली जाणार आहे, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

# शरद बुट्टे पाटील पुन्हा स्वगृही परतणार?

## भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुणे येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेतली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, खेड तालुक्यातील ज्येष्ठ जिल्हा परिषद सदस्य, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काल(दि.८)रात्री पुणे येथे राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांची भेट घेतली आहे.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कालच्या नियोजित दौऱ्यात संध्याकाळी उशिरा वराळे येथे शरद बुट्टे पाटील यांच्या निवासस्थानी भेट दाखवण्यात आली होती परंतु अचानक ही भेट रद्द झालेनंतर पवार यांनी शरद बुट्टे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना आपल्या जिजाई निवासस्थानी बोलावून घेतले होते.

भामा खोऱ्यामध्ये जिल्हा परिषद च्या माध्यमातून बहुतेक विकास कामांना निधी मिळाला आणि आताही मिळतो आहे परंतु राज्याच्या अर्थसंकल्पातून स्थानिक आमदार विरोधी पक्षाचा असल्याने निधी न मिळाल्यामुळे अनेक महत्त्वांच्या रस्त्याची कामे रखडली आहे ती मार्गी लागावीत अशी मागणी बुट्टे पाटील यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे केली.चाकण – करंजविहिरे – वांद्रा, शिरोली – पाईट- वांद्रा या मुख्य रस्त्यांसह कडूस किवळे कोरेगाव आणि चांदुस- कोरेगाव – कुरकुंडी- धामणे या प्रमुख जिल्हा मार्गांना तसेच श्री क्षेत्र कुंडेश्वर येथील घाट रस्त्याचे रुंदीकरणासाठी, राज्याच्या अर्थसंकल्पातून मोठा निधी मिळावा अशी मागणी बुट्टे पाटील समर्थकांनी केली.

त्याचबरोबर भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांसाठी निवडणुकीनंतर बैठक आयोजित करावी, दुर्गेश्वर लेणी गडद आणि येसूबाई मंदिर कोळीये यांना क वर्ग तीर्थक्षेत्र क्षेत्र दर्जा मिळावा, आंबेठाण येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करावे यासह जिल्हा वार्षिक योजना आराखड्यातून मार्चमध्ये विविध विकास कामांना निधी मिळावा अशी मागणी बुट्टे पाटील यांनी केली.



### बरोबर घेण्यास होकार

» लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे उमेदवार शिवाजी आढळराव पाटील आणि विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे उमेदवार दिलीप मोहिते पाटील यांच्या प्रचारामध्ये बुट्टे पाटील यांनी अनेक सभा गाजवल्या होत्या. त्यामुळे या दोन्ही नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध आले आहेत. यातूनच आढळराव पाटील यांनी बुट्टे पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस घेण्याच्या संदर्भामध्ये सुचित केले आहे. तर दिलीप मोहिते पाटील यांनी देखील बुट्टे पाटील यांना बरोबर घेण्यास होकार दिला असल्याचे समजते.

### शरद बुट्टे पाटील ११ वर्षांनंतर पुन्हा स्वगृही ?

» १९९९ मध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष म्हणून अजितदादा पवार यांच्याशी अतिशय सलोख्याचे संबंध असणारे शरद बुट्टे पाटील यांनी पवार यांचे नेतृत्वाखाली दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य आणि जिल्ह्याचे कृषी सभापती म्हणून काम केलेले आहे. वयाच्या २६ व्या वर्षी त्यांना पवार यांनी कृषी आणि पशुसंवर्धन विभागाचे सभापती केले होते. पुणे पदवीधर विधानपरिषद निवडणुकीसाठी प्रचंड तयारी केल्यानंतर देखील संधी न मिळाल्यामुळे बुट्टे पाटील यांनी राष्ट्रवादी कांग्रेस सोडली होती. पक्ष सोडताना देखील त्यांनी पवार यांचेशी प्रदीर्घ चर्चा केली होती. 2014 च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपाचे नेते गिरीश बापट यांच्या माध्यमातून त्यांनी भाजपचे प्रवेश केला होता.

### विकास कामांना निधी मिळावा

» त्याचबरोबर भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांसाठी निवडणुकीनंतर बैठक आयोजित करावी, दुर्गेश्वर लेणी गडद आणि येसूबाई मंदिर कोळीये यांना क वर्ग तीर्थक्षेत्र क्षेत्र दर्जा मिळावा, आंबेठाण येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करावे यासह जिल्हा वार्षिक योजना आराखड्यातून मार्चमध्ये विविध विकास कामांना निधी मिळावा अशी मागणी बुट्टे पाटील यांनी केली.

# आंबेगाव तालुक्यात 'एक व्यक्ती एक पद ' हा पॅटर्न राबवणार का ? वळसे पाटील यांच्या भूमिकेकडे लक्ष

## वळसे पाटील आणि आढळराव पाटील यांच्यासमोर तिकीट वाटपाचे मोठे आव्हान; विधानसभेच्या अनुभवातून नवीन रणनीती आखणार?

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि आंबेगाव तालुक्याचे आमदार दिलीप वळसे पाटील यांनी दोन -अडीच वर्षांपूर्वी तालुक्यात पदाधिकाऱ्यांसाठी एक व्यक्ती एक पद हा नियम लागू केला होता. खरे तर वळसे-पाटील यांनी लागू केलेला नियम हा अत्यंत चांगला आणि स्तुत्य आहे. मात्र, तालुक्यात आता होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही "साहेब " हाच नियम ठेवणार का ?

याकडे तालुक्यातील आम जनतेचे आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे. सलग आठ वेळा आंबेगाव तालुक्याचे प्रतिनिधित्व केलेले ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील हे एक शांत, संयमी आणि दूरदृष्टी असणारं नेतृत्व म्हणून सर्वांनाच परिचित आहे. वळसे पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास झाला आणि आजतागायत कार्यकर्त्यांची एकजूट ठेवण्यात ते यशस्वी ठरले.

दोन वर्षांपूर्वी आंबेगाव तालुक्यातील सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक झाली. त्या निवडणुकीत वळसे पाटील यांनी कार्यकर्त्यांना उमेदवारी देताना एक व्यक्ती एक पद हा नियम लागू केला होता. नियम तोडणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा देखील त्यांनी दिला होता.

बाजार समितीच्या निवडणुकीनंतर सन २०२४ साली विधानसभेची निवडणूक झाली आणि झालेल्या निवडणुकीत वळसे पाटील यांना काठावर पास व्हावे लागले. अर्थात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांची घडी त्या निवडणुकीत विस्कटल्याचे देखील काही अंशी पाहायला मिळाले.

तद्नंतर दीड वर्षानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येऊन ठेपल्या असताना कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन कोणाला उमेदवारी द्यायची आणि कुणाला खाली बसवायचे ही मोठी जबाबदारी अर्थातच नेते म्हणून दिलीप वळसे पाटील आणि त्यांच्या बरोबरीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात खांद्याला खांदा लावून काम करत असलेले माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यावर निश्चितच आहे.




### अनेक जण इच्छुक

» वळसे पाटील यांचे गेल्या ३५-४० वर्षातील राजकारण पाहता संयमाने निर्णय घेणारे आणि योग्य व्यक्तीला पदावर बसवणे हा त्यांचा आतापर्यंतचा इतिहास राहिला आहे. होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या वतीने अनेक जण इच्छुक आहेत. त्यामुळे वळसे पाटील नक्की कुणाला उमेदवारी देणार आणि एक व्यक्ती एक पद हा त्यांनी केलेला नियम ते पाळणार की तोडणार ? याकडे आता सर्वसामान्य जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.